आपल्या बातम्या, आतल्या बातम्या...
आपलं महानगर | My महानगर.com
www.mymahanagar.com



# के. के. वाघ अभियांत्रिकीच्या १८९ विद्यार्थ्यांना नोकरी

## कॉम्प्युटर, आयटी, कॉम्प्युटर सायन्स विभागातील विद्यार्थ्यांचा समावेश

**नाशिक ।** के. के. वाघ शिक्षण संस्था संचलित के के वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या ट्रेनिंग अँड प्लेसमेंट सेल मार्फत शैक्षणिक वर्ष २०२४- २५ मधील कॉम्प्युटर, आयटी, कॉम्प्युटर सायन्स अँड डिझाईन आणि आर्टीफिसिअल इंटेलिजन्स अँड डेटा सायन्स या विभागातील विद्यार्थ्यांसाठी कॅम्पस ड्राईव्हचे आयोजन करण्यात आले. या मध्ये सुमारे ५० हून अधिक नामांकित मल्टिनॅशनल उद्योगसमुहांनी सहभाग घेतला. यांत १८९ विद्यार्थ्यांना नोकरीची सुवर्ण संधी मिळालेली आहे.

१८९ विद्यार्थ्यांपैकी ७३ मुली व ११६ मुले आहेत. नोकरी मिळालेल्या विद्यार्थ्यांना सरासरी ४.८० लाख रुपयांचे वार्षिक पॅकेज प्राप्त झालेले आहेत. या उद्योगसमूहांमध्ये आयटी इंडस्ट्रीज, कोअर इंडस्ट्रीज आणि सर्व्हिस इंडस्ट्रीजचा समावेश होय. तसेच नेटविन्स, टीसीएस, आणि जोश सॉफ्टवेअर यांसारख्या कंपन्यांचा समावेश होय.

त्यामध्ये फिनक्यू, जोश सॉफ्टवेअर, इन्फोसिस, आयबीएम, टेक महिंद्रा, एचएसबीसी, केपीआयटी, विंजित आणि एनसीडीईएक्स यांसारख्या अनेक कंपन्यांचा समावेश आहे. ॲप्टिट्यूड टेस्ट, ग्रुप डिस्कशन, टेक्नीकल इंटरव्ह्यू आणि व्यक्तिगत मुलाखत अशा फेरीमधून विद्यार्थ्यांची निवड केली गेली. त्यापैकी काही कंपन्यांचे निकाल येणे बाकी असल्याची माहिती ट्रेनिग अँड प्लेसमेंट अधिकारी डॉ. पी. के. शहाबादकर यांनी दिली. महाविद्यालयातील ८ विद्यार्थ्यांना दुबई येथील अलाईड कँट्रयाक्टिंग व फाईव्ह होल्डिंग्स या नामांकित कंपनी मध्ये एक महिन्याची इंटर्नशिपची संधी मिळालेली आहे. त्यामध्ये कॉम्पुटर सायन्स अँड डिझाइन ४, मेकॅनिकलचे १, आयटी १ व सिव्हिलचे २ अशा एकूण ८ विद्यार्थ्यांचा समावेश असल्याची माहिती होते. त्यांना इंटर्नशिपचे मानधन मिळणार असल्याची माहिती प्राचार्य डॉ. के. एन. नांदूरकर यांनी दिली.

संस्थेचे अध्यक्ष मा. समीर बाळासाहेब वाघ, विश्वस्त मंडळ, जनसंपर्क संचालक मा. अजिंक्य बाळासाहेब वाघ, सचिव प्रा. के. एस. बंदी, प्राचार्य डॉ के एन नांदूरकर, विभाग प्रमुख डॉ. एस. एम. कमलापूर, विभागप्रमुख डॉ. प्रिती भामरे, टी अँड पी समन्वयक प्रा. श्वेता जाधव, प्रा. प्रणाली शिंदे, प्रा. प्रगती पंडित यांनी सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.